

# ज्योती

***************************************************************************************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ neomm.org NEOMM Tax ID: 34-1644989

एप्रील–मे २००७

***************************************************************************************************

## कार्यकारिणी २००७

अध्यक्षः पराग काळे
president@neomm.org

सचिवः भास्कर मराठे
secretary@neomm.org

कोषाध्यक्षाः स्मिता सामंत
treasurer@neomm.org

सांस्कृतिक कार्यवाहः
चित्रा लेले, हेमांगी काळे, तन्मयी दीक्षित

‘ ज्योती ’– संपादकः अंजू जोशी

सहसंपादकः कौस्तुभ लेले,
editor@neomm.org

‘ ज्योती ’मुद्रक–वितरकः अजित जोशी

वेब मास्टरः चैताली नाडकर्णी

वेब सहाय्यः आदेश दर्यापूरकर, समीर देशपांडे, प्रभा सातोसकर

विश्वस्त–रजनी दिवाण, रजनी शेंदुरे, कृष्णा देशपांडे

************************

## ज्योतीसाठी साहित्य

गावातील साहित्यिक मंडळींकडून *ज्योती* मध्ये साहित्याची आवश्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, ईनोद; दर सम महिन्याच्या (फेब्रु., एप्रिल, जून इत्यादि) १५ तारखे पर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्तलिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

*******************

## संपादकीय---

**सं**पली म्हणता म्हणता जाता जाता थंडीने आम्हाला चांगलीच चपराक दिली. धरतीच्या कुशीतून हळूच डोकावू पहाणारे हिरवे कोवळे कोंब आणि काटक्यांगत झालेल्या झाडांवर फुटू पहाणारी हिरवट कोवळी पालवी चांगलीच गोंधळून आणि गारठून गेली.

नुकतेच इशान्य अमेरिकेला वादळ वाऱ्याने चांगलेच झोडपून काढले आणि निसर्ग राजाच्या या बदललेल्या पवित्र्याने वसंताची आतुरतेने वाट पहणाऱ्या हिरवाईचा पार हिरमोड झाला.

आम्ही ऋतुचक्राचा नियमितपणा शिकण्याऐवजी आमच्या अनियमितपणाचे कित्ते जर ऋतुचक्राने गिरवायला सुरुवात केली तर येणारा काळ किती कठीण असेल हे लहान मूल देखील सांगू शकेल.

आमच्या कतृत्वानेच आम्ही पर्यावरण संतुलन खिळखिळे केल्याने ही वेळ आली आहे. सर्वच आघाड्यांवर ही स्थिती आहे. सामाजिक, राजकीय (ते कधी होते?) व कौटुंबिक स्तरांवर हीच त~हा आहे. वैयक्तिक पातळीवर मानसिक संतुलन बिघडल्याचे परिणाम ‘ व्हर्जिनीया टेक ` मधील भीषण हत्याकांडाने दाखवून दिले आहेत. त्याची माहिती प्रसार माध्यमांमार्फत जगाच्या कानाकोप~यात पोचलीच आहे. सर्वच पातळ्यांवर संतुलनाची गरज आहे हे आम्हाला कळून चुकले आहे, पण प्रश्न आहे ते आम्हाला वळणार कधी? आम्ही त्यासाठी कधी तयार होणार?

–अंजू जोशी

****************************************

## Upcoming Events

**August 25:** Good time cruise (Fund raiser event)

**September 29 :** Ganapati: Musical performance by Saleel Kulkarni

**November 17 :** Diwali program: (local talent show)

**Please spread the word about these events and help make them a huge success.**

## आगामी कार्यक्रम

### मीना नेरूरकर–

कलाभवनसादर करत आहे –

### हिक्स टाउनचा गणेशोत्सव

शनिवार, ५ मे २००७ सायंकाळी ४ वाजता **स्थळ**–सोलन हाय स्कूल ऑडिटोरियम ३६००, इनवूड रोड, सोलन, ओहायो ४४१३९

**रूपरेषा**–सायंकाळी ४.००– नोंदणी व चहा , कॉफी

५.०० ते ६.३०– नाटक

**प्रवेश शुल्क**–

**सभासद**–$१२.००

**विद्यार्थी(with ID)** $१०.००

**अन्य**– $१५.००

**RSVP:** Please e-mail secretary@neomm.org **Call:**Chitra Lele: (440) 449-1625 **OR** Tanmayee Dixit: (440) 423-1446 **By Noon on May 02, 2007** and let us know how many will attend this program.

## Advertisement Rates

per bimonthly issue

| | |
|---|---|
| Qrtr Page: | $25 |
| Half Page: | $50 |
| Full Page: | $75 |

**. All rates for the Diwali issue are double.**

********************

## अध्यक्षीय–मनोगत

नमस्कार मंडळी! सूर्याने मकर रेषा ओलांडली व सर्वांनाच वसंत ऋतुचे वेध लागले. " होळी जळाली थंडी पळाली" म्हणत आपण सर्वांनी पुरणपोळीचा आस्वाद घेऊन होळीचा कार्यक्रम यशस्वी केलात. मराठी मंडळाची वेबसाईट काही वर्षांपूर्वी सुरु झाली होती पण आता ती अद्ययावत झाली आहे. माझ्यादेखील काही नवीन कल्पना आहेत. आपणापैकी कुणाकडे साईट साठी सूचना असल्यास जरूर मला संपर्क करावा.

मराठी मंडळाच्या आगामी कार्यक्रमांबद्दलची माहिती 'ज्योती' मध्ये व आपल्या साईटवर उपलब्ध आहेच. यावर्षी देखील परंपरेनुसार दिवाळीला स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम योजले आहेत. तुमच्या रोजच्या धावपळीतून थोडा वेळ काढून कार्यक्रमात भाग घ्याल आणि आपला कार्यक्रम दर्जेदार होण्यास मदत कराल अशी अपेक्षा आहे. त्यायोगे आपल्यातले छुपे रुस्तम कलाकार बाहेर पडतील व मुरलेल्या कलाकारांना संधी मिळेल. ५ मे ला मीना नेरूरकर लिखित व दिग्दर्शीत हिक्सटाऊन्चा गणेशोत्सव हे नाटक सादर करत आहोत आापल्यासारख्या छोटया मंडळाचे यश सर्वांच्या उपस्थितीवर अवलंबून आहे. त्यामुळे आपण सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा अशी कळकळीची विनंति आहे.

**आपला**
**पराग काळे**

************************************

## आरसा

"आरश्यात तोंड पाहिलयस का?" लहानपणच्या भांडणात नेहेमी ऐकायला मिळणारा हा इषारा. आता खरं तर एखादी गोष्ट मला करता येईल की नाही, याचा दिसण्याशी काय संबंध? पण एक निरुत्तर करणारा बाण म्हणून याचा नेहेमी वापर होत असे. अलिकडे मात्र अशी वाक्य ऐकायला लागत नाहीत हे ही खरं आहे. याचा अर्थ आता लोकांना माझ्या क्षमते विषयी शंका वाटत नाही असा घ्यावा काय? कुणी सांगावं, कदाचित आता चेहेरा बरा दिसू लागलाही असेल!

बालपणीच्या आरशा समोर उभं करून "हा, किंवा, ही, कोऽऽऽण?" खेळा पासून ते मोठेपणी सूक्ष्मदर्शीतून अणुच्या अंतरंगात डोकावताना किंवा दूरदर्शीतून अवकाशातले तारे न्याहाळताना थक्क होण्या पर्यंत मनुष्याचा आरशाशी सदैव संबंध येत असतो. या वाक्यातल्या न्याहाळताना या क्रियापदामुळे 'ते आकाशातील तारे नसून त्या धरती वरच्याच तारका तर नव्हेत ना, श्रीकांत?' असा खवचट प्रश्न काही जणांना पडणं स्वाभाविक आहे. परंतु मुद्दा आरशाशी सदैव संबंध येत असतो हा आहे. त्यातही शाळकरी वयात इतरांच्या डोळ्यावर उन्हाचे कवडसे पाडण्यातला आनंद काही वेगळाच! त्याची तुलना, तरूणपणी आरशा समोर उभ राहून नट्टापट्टा करण्यात मिळणाऱ्या आनंदाशीच कदाचित करता येईल.

आरशाचा वापर फार फार पूर्वी पासून आपण, करीत आलो आहोत. तरीही आज आपल्याला माहिती असलेल्या स्वरूपातल्या आरशाचा, म्हणजे काचेला एका बाजूने पारा अथवा पाऱ्या समान अन्य धातूचा मुलामा लावलेल्या आरशाचा, वापर तसा अलिकडचाच आहे. रोमन साम्राज्याच्या ऐन भराच्या काळातल्या काही दफनस्थानांपाशी एका बाजूने सोन्याचा मुलामा असलेले काचेचे तुकडे आढळून आले आहेत. ते आरशाचे असण्याची शक्यता आहे.

अतिपरिचयामुळे सहज गृहित धरली जाणारी "काच" ही वस्तु किती जुनी असेल असं तुम्हाला वाटत? एका रोमन इतिहासकाराने केलेल्या उल्लेखा वरून असं दिसतं की काचेचा शोध ख्रिस्तपूर्व सुमारे ५५०० वर्षे आधी लागला. अरे बापरे, म्हणजे साधारणत: साडे सात हजार वर्षां पूर्वी! हा शोध, अन्य अनेक शोधां प्रमाणेच, अपघाताने लागला असं त्या इतिहासकाराची नोंद सांगते. काही दगड व्यापारी, हणजे दगडांचा व्यापार/वाहतूक करणारे; व्यापारी दगड नव्हेत, सिरियाच्या किनाऱ्यावर थांबले असताना त्यांनी जेवण बनवण्यासाठी लावलेल्या चुलीं शेजारी "नायट्रेटचे" खंड होते. अति उष्णतेमुळे ते खंड आणि भोवतालची वाळू वितळून एक द्रव मिश्रण तयार झालं. ती मानवाला अपघाताने "सापडलेली", बहुधा पहिली, काच. ही काच पारदर्शक मात्र नव्हती.

त्या नंतर मनुष्याने बहुतेक एक डुलकी घेतली असावी. कारण काचेचा नंतरचा उल्लेख सापडतो तो आनखी १५०० वर्षानी, इसवी सना पूर्वी सुमारे ३५०० वर्षे मागे. मेसोपोटॅमिआच्या मध्यवर्ती भागात [आजचा इराकचा प्रदेश] काचेचे मणी सापडले. हे मणी सुद्धा पारदर्शक नसले तरी चकाकी असणारे आणि रंगीतही आहेत्. काचे पासून सोप्या, प्राथमिक प्रकारच्या वस्तु बनवण्याची हातोटी मानवाला साधलेली दिसते. या नंतर मात्र मनुष्याने ताणून दिली असली पाहिजे. कारण मधल्या काळात लहान–मोठया सुधारणा झाल्या असल्या तरी, खरी प्रगति झाली ख्रिस्तजन्माच्या सुमारास. याचा ख्रिस्ताच्या जन्माशी काहीही संबंध नसावा हे जाता जाता नमूद केले पाहिजे. कालमापनाच्या सोयीसाठी संदर्भ म्हणून वापरलेली, एक सर्वांच्या माहितीची घटना एवढाच त्याचा संबंध. त्या सुमारास हवेने काच फुगवून तिला शक्य तसे आणि निरनिराळे आकार देण्याची कला आणि

************************************

शास्त्र माणसाला अवगत झालेले दिसते.

पेन्सिल्वेनिया मध्यल्या कॉर्निंग गावात कॉर्निंगचा कारखाना आहे आणि शेजारीच एक छोटसं संग्रहालय आहे. काच बनविण्याची प्रक्रिया आणि काचेच्या वस्तु तयार करण्याचं प्रात्यक्षिकही तिथे बघायला मिळतं. आपल्या या माहितीपूर्ण अनुभवाची अखेर, अर्थातच, इथल्या पद्धतीनुसार त्यांच्या दुकानात खरेदीसाठी होते हे वेगळ सांगायची गरज नसावी. वाचकहो खरेदीचा विचार करताना मुद्दा विसरू नका. आपण काचे बद्दल बोलत होतो. त्या संग्रहालयात काचेचा इतिहास अतिशय व्यवस्थितपणे मांडलेला आहे. गंमत म्हणजे एका ठिकाणी इजिप्तमधे सापडलेली निदान दोन हजार वर्ष जुनी, पुरातन, गर्द निळसर काचेची एक बाटलीसुद्धा ठेवलेली आहे. इतर काच सामानाच्या मांडणीला हात सुद्धा लावण्यची तिथे परवानगी नाही, पण त्या बाटलीला तुम्ही बोट लावून दोन हजार वर्षे जुन्या, मानव निर्मित वस्तूला स्पर्श केल्याचं समाधान मिळवू शकता. जगभरातल्या निरनिराळ्या देशांच्या आणि निरनिराळ्या संस्कृतींच्या इतिहासातले काचेचे उपयोग आणि दाखले तिथे पहायला मिळतात. परंतु ऐतिहासिक शोध किंवा वापर म्हणून भारताचा काचेसंदर्भात त्यात उल्लेखही दिसत नाही. पाश्चिमात्य इतिहासकार आणि तज्ञांची भारता बद्दलची अनास्था आणि दुर्लक्ष, किंवा अनास्था म्हणून दुर्लक्ष, माहिती असलं तरी मला या गोष्टीचं आश्चर्य वाटतं की काचेच्या संदर्भात भारताचा, भारतातील एखद्या ठिकाणाचा अजिबातच उल्लेख कसा नाही? मी आठवण्याचा प्रयत्न केला पण मला शिकलेला, वाचलेला किंवा ऐकलेला एकही संदर्भ आठवला नाही की, उदाहरणार्थ, महाभारतात काचेचा अमुक असं वर्णन आहे, वगैरे. नंतर महाभारतात त्याचा थोडाफार शोधही घेतला पण कुठे उल्लेख दिसला नाही. माझं महाभारताचं वाचन म्हणजे खरं तर वर वर चाळणंच म्हणायला हवं. मला अजुनही असं वाटतं की त्यात, उदाहरणार्थ, मयसभेच्या वर्णनात, काचेचा शोध लागेल. रामायणातली रामाच्या शैशवातली लोकप्रिय गोष्ट सर्वांना माहिती असेलच. रामाचा "चंद्र हवा" हा हट्ट पुरवण्यासाठी सुमंत रामाच्या हातात एक थाळी/परात देऊन प्रतिबिंबाने त्याचं समाधान करतात अशा आशयाची ती गोष्ट आहे. इथेही पहा, काचेचा आरसा वापरल्याचा उल्लेख नाही. आपल्या मंडळात रामायण–महाभारताचे काही जाणकार आहेत त्यांनी या गूढावर प्रकाश टाकवा.

पूर्वी मला आरसा हा शब्द बहुधा फारसी भाषेतून जसाच्या तसा किंवा रूपांतरित होऊन आला असावा असं वाटत असे. मध्यंतरी विचार करताना एक कल्पना सुचली. ती म्हणजे, "रस" म्हणजे प्रवाही पदार्थ. तेव्हा प्रवाही पाऱ्या पासून, पारा वापरून बनविलेला म्हणून तर आरसा हा शब्द

तयार नाहीना झाला? आ–रस म्हणजे पाऱ्या पासून [बनविलेला]. संस्कृतमधे "पारा" या अर्थी "रस" हा शब्द वापरला जातो का हे पहायला हवं. आरसा शब्दाची आणखी एक गंमत आहे. पुल्लिंगी शब्दाचं लिंग बदलताना इ/ई हा प्रत्यय वापरला जातो. जसं, घोडा–घोडी, बकुळ–बकुळी, दांडा–दांडी इत्यादि. ‘आरसा’ या शब्दाचं लिंग बदललं तर मात्र वेगळ्या अर्थाचा शब्द तयार होतो. आरसा–आरशी. आरशी म्हणजे चष्मा.

काचेचे नसले तरी आरशाचे उल्लेख मात्र आपल्याकडे पुष्कळ आहेत [अशी माझी समजूत आहे]. प्राचिन ग्रंथांमधे, काव्यामधे, आरशासाठी "दर्पण" शब्द आलेला बहुतेकांना माहिती आहेच. तथापि तो "आरसा" काचेचा(च) होता असं निश्चितपणे सांगता येईलच असं नाही. – हे वाक्य कुठलीही जबाबदारी न घेता लिहिण्याचं एक उत्तम उदाहरण आहे! कदाचित ती "दर्पणे" धातूपासून, धातूला एका बाजूला चकाकी आणून बनवलेली असण्याची शक्यता आहे. रोमन मंडळी असे धातूचे आरसे वापरत असत असं इतिहासकारांच म्हणणं आहे. प्राचिन काळा बद्दल निश्चित पुरावा नसला तरी अर्वाचिन काळात काचेची माहिती भारताला होती असं म्हणता येईल. कर्नाटकातल्या हळेबिडूच्या मंदिरात हातात आरसा घेऊन प्रसाधन करणाऱ्या रूपगर्वितेच् अत्यंत सुंदर शिल्प आहे. त्या घाटा वरून – आरशाच्या, तिच्या नव्हे, तो काचेचा आरसा आहे असं वाटतं. तो काचेचा आहे असं गृहित धरलं तरी हळेबिडूचं मंदिर होयसाळा घराण्याचं साम्राज्य असताना [हळेबिडू होयसाळांची राजधानी होती] म्हणजे साधारणतः १२व्या शतकाच्या उष्:काली उभारलं असावं. खजुराहो सारखी मंदिरं त्याच्या थोडं आधी म्हणजे दहाव्या–अकराव्या शतकातली आहेत. तिथेही अशी शिल्प असण्याची शक्यता आहे. पण अकरावं/बारवं शतक कुठे आणि ख्रिस्तपूर्व १५०० वर्ष कुठे! भारतासारख्या प्राचिन आणि त्याकाळी तुलनेने प्रगत असलेल्या संस्कृतीत काचेचा वापर किंवा माहितीचा संदर्भ सापडू नये हे एक आश्चर्य आहे.

आरशाचे प्रकार तरी किती! लहान आरसे, मोठे आरसे, उभे आरसे, आडवे आरसे, चौकोनी, गोल, सजावटीच्या कोंदणात बसलेले किंवा आरशांची सजावट करण्यासाठी वापरायचे आरसे. पर्स वरच्या आणि बांगड्यां वरच्या नक्षीमधे बसवलेले बारीक आरसे, तर एखद्या उपाहारगृहात किंवा प्रासादा मधले अख्खी भिंत व्यापणारे आरसे! वेगवेगळ्या आकारचे तर आरसे मिळतातच. पण अंतर्वक्र किंवा बहिर्वक्र आरसेही आपल्या खूप उपयोगाचे असतात. दिव्याचा प्रकाश लांबवर जाण्यासाठी किंवा दाढी करण्यासाठी रोज नकळत वापरतो ते आपण. एखद्या संग्रहालयातले अंतर्गोल आणि बहिर्गोल आरसे आपली विकृत प्रतिमा दाखवतात तेव्हा आपल्याला निराळीच गंमत वाटते.

आरशाचा एक महत्त्वाचा गुणधर्म आपल्याला लहानपणा पासून

माहिती आहे. तो म्हणजे प्रतिबिंबामधे डाव्या आणि उजव्या बाजूंची अदलाबदल झालेली दिसते. [अदलाबदल हा शब्द दलबदल या शब्दा पासून आला असावा काय? तसं असेल तर, लोकशाही पद्धती अस्तित्वात येण्या पूर्वी त्या साठी काही निराळा शब्द वापरात होता का? की तेव्हा, आरशामधे प्रतिबिंब जसंच्या तसं पडत असे? .... हे मात्र अति झालं हं. चला, मूळ विषयाकडे परतू या...]. लहानपणी सहावी/सातवीमधे प्रकाशाच्या परावर्तनाचे नियम शिकण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे आपल्याला या अदलाबदलीचं कारणही पक्क माहिती आहे अशी आपली समजूत असते. पण जरा विचार करून पहा. याचं कारण आरशात आहे की आपल्यामधे आहे? एकदा एका दंतवैद्याची स्वत:चीच दाढ खूप दुखु लागली. तेव्हा दुसऱ्या दंतवैद्याकडे जाण्या ऐवजी स्वत:च स्वत:वर उपचार करायचा असा निर्णय त्यानी घेतला. आपल्या व्यवसाय बंधूंचा दुसऱ्याचे दात कोरून पोट भरण्याचा उद्योग त्याला स्वानुभवा वरून माहिती असल्यामुळे त्याने हा निर्णय घेतला असावा हे उघड आहे. दुखऱ्या बाजूची दाढ आरशात पाहून त्याने काढली खरी पण तरीही दु:ख कमी होईना म्हणून शेवटी तो आपल्या दंतवैद्य मित्राकडे उपचाराला गेला म्हणतात! खरं खोटं देव जाणे. ऐकलेली गोष्ट आठवली म्हणून तुम्हाला सांगितली इतकच. रोजच्या व्यवहारात आपल्या लक्षात येत नाही, आणि त्यानी फारसा फरकही पडत नाही की, आरशात आपण जसे दिसतो तसे आपण खरं म्हणजे दिसतच नाही! छायाचित्रात – फोटोमधे आपण दिसतो तसे आपण खरे दिसतो! [वाक्य रचना विचित्र आहे. गोंधळून जाऊ नका. विषय अगदी सरळ आहे]. पुढचा संदर्भ गंभीर घटनेचा आहे पण विषयानुरूप आहे, तेव्हा उल्लेखा बद्दल राग मानू नका; अल्लाउद्दीनने जेव्हा पद्मिनीला आरशात पाहिली तेव्हा तिने जर गुजराथी पद्धतीने साडी नेसली असेल तर ती त्याला चक्क मराठी पद्धतीची दिसली असणार.

आज आपल्या सवयीचा झालेल्या आरशाचा शोध लागला नव्हता तेव्हा मानवी जीवन कसं असेल बरं? फार काही बिघडलं नसावं. आरशा शिवाय स्त्रिया नटत कशा असतील? का रोजची शिकार आणि बचाव यांमधे नटण्या मुरडण्याचा विचारही सुचत नसेल? दात घासण्याचा विशेष प्रश्न नसावा. आदिमानव चेहेऱ्याला रंग किंवा रंगीत माती लावत असावेत. ते नेहेमी स्वत:च्या चेहेऱ्या ऐवजी दुसऱ्याच्या चेहेऱ्याला रंगवत असतील का? दुसऱ्याच्या दिसण्या वरून अनुमानाने "आपण् स्वत:" कसे दिसत असू याची त्यांना कल्पना करता येत असेल? त्या काळी आरसा नव्हता असं समजायला हरकत नाही. तर मग, माणसाने सर्वप्रथम स्वत:ला कधी पाहिलं असेल? बहुधा पहिल्यांदा जेव्हा तो एखाद्या शांत सरोवरापाशी किंवा डोहापाशी गेला असेल तेव्हा स्तब्ध पाण्यात त्याला प्रतिबिंब दिसलं असेल, नाही का? पण त्याला कुठे माहिती आहे की ते त्याचं स्वत:चं प्रतिबिंब आहे? त्याने डोंगर आणि झाडांची प्रतिबिंब आधी पाहिली असतील हे खर आहे. पण मुळात आपण स्वत: दिसायला कसे आहोत हे माहिती असलं तर हे आपलं प्रतिबिंब आहे हे कळण्याचा प्रश्न येतो. स्वत:च्या प्रतिबिंबाला पाहून तो घाबरला असेल की त्यावर शस्त्र उगारून पाण्यात पडला असेल? ते प्रतिबिंब आहे हे लक्षात आल्या नंतर त्यात काही चमत्कार आहे अशी तर समजूत झाली नसेल? त्याचं स्पष्टीकरण देण्यासाठी एखादं तत्त्वज्ञान तर उभ राहिलं नसेल, जे कालांतरानं आवश्यकता न राहिल्यामुळे लुप्त झालं? मृगजळाचा फसवेपणा त्याच्या कधी लक्षात आला असेल का? मृगजळाचा आणि प्रतिबिंब पडण्याच्या कारणांचा संबंध लक्षात आला असेल का? विशेषत: वाळवंटात, प्रशांत पाण्यामधे पडलेली प्रतिबिंब जर त्याने कधी पाहिलीच नसतील तर मृगजळामुळे तो फसेल तरी कसा?

काचेचा शोध कधी का लागला असेना, मनुष्या जवळ एक आरसा सदोदित होता आणि आजही आहे. बघा लक्षात येतंय का तुमच्या? – आपलं मन! आपल्या मनाचा आरसा सदैव आपल्या जवळ असतो. मग आपल्याला नटण्याची आवड असो वा नसो. तुम्ही तो वापरता की नाही, तुम्हाला तो आहे याची जाणिव तरी आहे की नाही यावर त्याचं असणं अवलंबून असत नाही. तुमच्या सावली सारखा तो नेहेमी तुमच्या बरोबर असतो. ही सावलीची उपमा सुद्धा खरी काही बरोबर नाही. कारण काळ्याकुट्ट अंधारात देखिल हा आरसा तुमच्या सोबत असतोच. मनाचा शोध तरी माणसाला कधी लागला? म्हणजे आपल्याला स्वत:ला आणि आपल्या सारखंच इतरांना मन आहे, याचं आकलन कधी आणि कसं झालं असेल? ॲरिस्टॉटल, प्लेटो सारख्या ग्रीक, तसेच आपल्याकडे आद्य शंकराचार्यां सारख्या तत्त्ववेत्त्यांनी यावर विचार, चर्चा आणि भाष्य केलेलं आहे. मानवी मन अर्थातच मनुष्य पृथ्वितलावर अवतिर्ण झाला [उत्क्रांत झाला] तेव्हा पासून आहेच. पुरुषसूक्तात मनाचा स्पष्ट उल्लेख आहे. असो. आणखी थोडं लिहिलं तर हे स्फुटलेखन मानसशास्त्र आणि अध्यात्माच्या किनाऱ्यावर जाऊन थडकेला वेळ लागणार नाही.

मनाचा आरसा आपण वापरतो का? निश्चितच वापरतो. आपला सभोवतालाशी जे संबंध येतात त्याची प्रतिबिंब जाणता अजाणता, सामान्यत: अजाणताच, आपल्या या अदृष्य आरशावर उमटत असतात. लक्षात घ्या, नुसती पडत नाहीत, उमटत असतात. हे एक मनाच्या आरशाचं इतर आरशां पासूनचं वेगळेपण. खरी गंमत पुढेच आहे. या प्रतिबिंबां वरून बऱ्याचदा आपण आपले भविष्यातले व्यवहार कसे करायचे हे ठरवत असतो. मग ते इतर व्यक्तींशी असतील वा प्रसंगांशी असतील. आपण याला अनुभवातून मिळालेलं ज्ञान म्हणतो. ते अनुभव चांगले की वाईट हे, सामान्यपणे, ते आपल्याला व्यक्तिश: सुखकारक होते की क्लेशदायक होते त्यावर

अवलंबून असतं आणि त्यानुसार आपण भविष्यात कसं वागायचं ते ठरवत असतो. इथे ह्या आरशाचं आणखी एक वैशिष्ठय लक्षात घेतलं पाहिजे. काही परिच्छेदांपूर्वी आपण पाहिलं की आरशातल्या प्रतिबिंबमधे बाजूंची अदलाबदल झालेली असते. मनाचा आरसा तर आणखी एक पाऊल पुढे जातो. प्रतिबिंब जेव्हा स्वत:शी संबंधित असतं, तेव्हा मन त्याची चांगली बाजू चांगली दाखवतच, वर आणखी वाईट बाजूही चांगली करून दाखवतं! याचं भान आपण ठेवायला हवं म्हणजे या निसरड्या वाटेवर चालताना आपण घसरणार नाही. प्राणी म्हणून अंतत: स्वत:ला जपण्यासाठी हे कदाचित नैसर्गिकच असेल, पण् मग मनुष्य म्हणून उत्क्रांत होताना आपण स्वत:च स्वत:च्या प्रगतीला बांध घालतो आहोत असं होण्याची शक्यता असते.

मला वाटलं त्या पेक्षा हे स्फुटलेखन जरा लांबल खरं. मग काय मंडळी, स्प्रिंग क्लीनिंग करताना आवार आणि घर निटनेटक करण्याच्या गडबडीत असाल. घरातल्या इतर वस्तुं बरोबर जेव्हा आरसा पुसायला आणि चकचकित करायला जाल तेव्हा विसरू नका, की आणखी एक आरसा स्वच्छ आहे ना? ते पहायला हवं. बहुतेक असेलच, पण एकदा खात्री करूया. तो आरसा आपला प्रत्येकाचा स्वत:चा आणि वेगळा आहे. आणि हो, तो तुमच्या इतक्या जवळ आहे की तो फक्त तुम्हीच स्वच्छ करू शकता. आरसा जेवढा सपाट, गुळगुळीत आणि नितळ स्वच्छ, तेवढ्ंच त्यात पडणारं प्रतिबिंब जसंच्या तसं, सुरेख आणि स्पष्ट. आपल्या या खास आरशाचही तसच आहे. जर पूर्वग्रहाचा रंग चढला असेल, बऱ्या वाईट विचारांची जळमटं धरली असतील किंवा जरी कितीही पातळ असलं तरी, त्यावर जर अहंकाराचं अभ्र आलं असेल तर स्पष्ट, सुरेख प्रतिबिंब त्यावर उमटणार तरी कसं? ती प्रतिमा धुरकट, अस्पष्ट आणि विकृतच असायची शक्यता अधिक. पटतय तुम्हाला? पहा विचार करून; अन् उचला बरं तो झाडू! इतरांच राहू दे.कुणी सांगाव तुम्ची तुम्हाला तरी खरी अे्ळख पटेल.

**- श्रीकांत लिमये**

************************************

**आत्मविश्वास व अतिआत्मविश्वास यात फरक काय**?
आपण आपल्या मैत्रीणीची पप्पी घेऊ शकतो हा झाला आत्मविश्वास व फक्त **आपणच** आपल्या मैत्रीणीची पप्पी घेऊ शकतो हा झाला अतिआत्मविश्वास !

****************************************

गुंड्या– माझी आई सर्विस करते
बंड्या– माझी आई टेनिस खेळत नाही

---

**१३ मे ला मातृदिन आहे त्यानिमित्ताने–**

## वाट पहाणारं दार–

प्रत्येक घराला एक वाट पहाणारं दार असतं,
खरच सांगतो त्या दाराच नांव आई असतं,
ऊबदार विसाव्याचं ते एकमेव स्थान असतं
प्रत्येक घराला एक वाट पहाणारं दार असतं–१
वाट पहाणाऱ्या दाराला आस्थेचं महिरपी तोरण असतं
घराच्या आदरातिथाचं ते जणू एक परिमाण असतं नीतिमत्तेच्या
उंबरठयाआड मर्यादेचं त्याला भान असतं
प्रत्येक घराला एक वाट पहाणारं दार असतं–२
दारिद्र्याच्या दशावतारात हे कधीच मोडत नसतं
कोत्या विचारांच्या वाळवीनं कधीच सडत नसतं
ऐश्वऱ्याच्या उन्मादानं ते कधीच फुगत नसतं
प्रत्येक घराला एक वाट पहाणारं दार असतं–३
सुनां नातवंडाच्या आगमनाला तुकडापाणी घेऊन सज्ज असतं
लेकीच्या पाठवणीला अश्रुंना वाट करून देतं
व्यसनांत अडखळलेल्या पावलांना जरबेनं ताळ्यावर आणतं
प्रत्येक घराला एक वाट पहाणारं दार असतं–४
मित्रांनो उभ्या आयुष्यांत फक्त एकच गोष्ट जपां
उपहासाची करवत या दारावर कधी चालवू नका
मानापमानाचे छिन्नी हातोडे या दारावर कधी मारू नका–५
स्वार्थी अपेक्षांचे खिळे या दारावर कधी ठोकू नका
घराच रक्षण करणाऱ्या या दारास कधीमोडकळीला आणू नका
प्रत्येक घराला एक वाट पहाणारं दार असतं
खरच सांगतो या दाराचं नांव आई असतं–६

**कवी–मिलींद विष्णू देश्पांडे**
**संग्राहिका–श्यामलाताई चितळे**

****************************************

**पी.जे. कॉरनर**

दोऱ्याची बायको (दोरी) गरोदर असते. बाळंतपण अवघड होऊ लागते त्यावेळी डॉक्टरांना शस्त्रक्रीया करावी लागते. सर्व आटोपून डॉक्टर बाहेर आले तर घाबऱ्या घाबऱ्या दोरा विचारू लागला ,' डॉक्टर काय झाल ?' डॉक्टर म्हणाले, 'काय होणार ,` गुंता झाला! `

****************************************

बाबा– रावणाच्या लंकेला सोन्याची लंका का म्हणतात?
बंड्या– कारण ,आईबाबा त्याला लहानपणी सोन्या म्हणत असत.

---

**पी.जे– संकलन–अजित जोशी**

**Y. K. TAMASKAR**

**ENHANCE YOUR WEALTH BY TAKING ADVANTAGES OF SECTION 419F/S, SECTION 412, SECOND TO DIE POLICY**
**Without wasting time surfing web internet lovers can get better deal on Term – life , Whole life, Universal life and Second-to-die life insurance policies.**

**WE ASSURE THE BEST PRODUCTS.**

**ENJOY OUR UNIQUE AND COZY HOSPITALITY WHICH**
**NO ONE PROVIDES**
**TRY US AND SAVE YOUR MONEY**
**PLEASE CALL**
**Y. K .TAMASKAR**
**FOR NO OBLIGATION INFORMATION**
**TEL: 440 729 8293**
**440 729 8296**
**FAX: 4407298296**

## नांवात काय आहे?

मध्यंतरी माझ्या मुलीच्या आईची ओळख झाली. बोलता बोलता त्या म्हणाल्या , 'मी मुंबईची , अमुक अमुक ठिकाणी रहाते. मग त्या मला अगदी जुनी ओळख असल्यासारख्या जवळच्या वाटायला लागल्या. त्यांनी सांगीतलेल्या त्यांच्या घराजवळच्या खाणा खुणा डोळ्यासमोर आल्या आणि जुन्या मैत्रिणी असल्यासारख्या आमच्या गप्पा रंगल्या. त्यांच्याशी बोलताना मी माझ्या शाळा कॉलेजच्या विश्वात शिरले. मुंबईतल्या त्या त्या भागात मनाने फिरून आले. असा आहे आपआपल्या गांवाच्या नांवाचा महिमा.

नांवात काय आहे असं म्हणतो, पण नांवात खूप काही आहे. 'नांव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा' अशी म्हण आहे,– नांवाला सार्थ अस व्यक्तिमत्व असावं असाच त्याचा अर्थ नाही का?

प्रत्येक शहराच आपलं असं व्यक्तिमत्व असतं. संत्री म्हटली की नागपूर आठवत, पेठा म्हटला की आग्रा आठवतं, बाकरवडी म्हटली की ती चितळ्यांचीच असायला हवी, थोडक्यात प्रत्येकाच वैशिष्टय आपल्याला त्याच्या नावाची आठवण करून देतं.

लग्नानंतर माझ नांव बदलून अंजली ठेवलं पण सुरवातीला मला कोणी अंजली म्हणून हाक मारली की मला कळायचच नाही की ही हाक माझ्यासाठी आहे, ते नांव माझ्या परिचयाचं नव्हतं ना. आपण म्हणतो परमेश्वर एकच आहे पण कृष्ण म्हटल की डोक्यावर मोरपीस असलेला कृष्णच उभा राहातो. काही वेळा एखाद्याला मदत केलेली कळू द्यायची नसेल तर मदत करणा~या व्यक्तिच नांव आपण जाहीर करत नाही. मदत घेणा~याला मात्र सारख वाटत रहातं कोण असेल ही व्यक्ती नांव कळलं असतं तर जाऊन आभार तरी मानले असते. अर्थात त्यामुळे मदतीचं मोल कमी होत नाही. तर असं हे नामपुराण ! नांवात काय आहे असं म्हणण्याऐवजी मी तर म्हणेन नांवात बरच काही आहे! नावामुळे व्यक्तिमत्वाला एक झालर आहे. त्या त्या नांवाचा चांगला किंवा वाईट प्रभाव लोकांवर आहे तेव्हा आपल नांव ऐकलं की लोकांच्या कपाळावर आठया पडणार नाहीत असं वागण्याची काळजी घेण महत्त्वाचं आहे नाही कां ?

**–अंजली चितळे**

*********************************

**हसा आणि लठ्ठ व्हा...**

गब्बर– ये हाथ मुझे दे दे ठाकूर .

ठाकूर–अरे वेड्या आपण काय पाच तीन दोन खेळत आहोत का?

************************************

**गाढवाच ओझ –**

*ज्याच त्याला अन् गाढव ओझ्याला* ही म्हण शाळेंत प्रथम कानावर पडली होती, पण तिचा अर्थ कधींच लक्षांत आला नव्हता. आणि या म्हणीचा मंत्रवत् उपयोग होइल असें तर कधींच वाटले नव्हतें. संस्कृत मंत्र आणि प्राकृत म्हण यांचें नातें जरा चमत्कारिकच वाटतें नाहीं कां? शिवाय गाढवाचा उल्लेख मंत्रांत कशासाठी?

बिचारें गाढव ! लादलेलें काम मुकाटपणें करण्याच्या बदल्यांत निर्बुद्धपणाचा शिक्का मिळतो. एवढ्यावरच भागत नाहीं तर असें निमूटपणें काम करण्याच्या मूर्खपणाला गाढवपणा म्हटलें जातें. अर्थात मला असें म्हणायचें नाहीं कीं गाढवाला माणसासारखी बुद्धि असते. पण तो एक भाग सोडला तर गाढवाचें वागणें प्रतीकात्मक समजून घेण्यासारखें आहे.

*कर्मण्येवाधिकारस्ते ...* हा गीतेंतला श्लोक बहुतेकांस माहीत असतो. त्याचे विविध अर्थही सांगितले जातात, अगदी परस्परविरुद्ध वाटावे असेही. एका बाबतीत मात्र एकवाक्यता आहे कीं अहंकाराची बाधा कमी करावी. पण सर्व दोषांत सर्वांत प्रबळ असतो अहंकार. त्याच्यावर मात करणें सर्वांत अवघड असतें.

अहंकारावर मात बुद्धिपूर्वक करणें अशक्यच, कारण बुद्धि अहंकाराचें मुख्य साधन असते. त्यामुळें अहंकारावर हल्ला बुद्धीला बगल देऊनच करायला हवा, बुद्धीला धक्का न बसेल अशा रीतीनें. त्यासाठीं मदत लागते गाढवपणाची – मूर्खपणाची नव्हे.

गाढवाचें काम बघा – मालकानें पाठीवर लादलेलें ओझें वाहून नेतें. ओझें कशाचें आहे, कोणाला पोहोंचवायचे आहे, कशासाठी, असले प्रश्नच नसतात. फक्त वाहण्याचें कर्तव्यच तेवढें असतें. त्याला नसतें ममत्व व नसतो अहंकार.

आपल्या जीवनांत अहंकाराची बाधा प्रकर्षानें जाणवते ती दुसऱ्याला कांहीं देतानां किंवा मदत करतानां. या भावनेचे विशेष विश्लेषण येथें करण्याची गरज नाहीं आणि जागाही नाहीं. पण दान किंवा मदतीचें ओझें *इदं न मम ।* या भावनेनें वाहता येणें या *गाढवपणा*ची संवय करायला हवी.

ज्याला मदतीचा लाभ असतो त्याला मदत पोहोचती करणे हा *गाढवपणा* करावा. परंतु ओझें वाहणें केवळ जड पदार्थाची हलवाहलव नसून त्यांत अकलेचा भाग असल्यानें जाणीवपूर्वक मानवी बुद्धि वापरून कार्य पार पाडावें. मदतीस आपल्याला नेमतो तो ओझ्याचा मालक आणि ज्याला मदत पोहोचवायची तो त्याचा गिऱ्हाईक असें मानून मदतीचें ओझें वाहाणें म्हणजेच वर म्हटलेल्या मंत्राचा जप होय.

या मंत्राची फलश्रुति अशी. दुसऱ्याला मदत करण्याचा एक आनंद असतो. पण त्याबरोबर आपण मदत केल्याची भावना वा जाणीव अनिवार्य असते. अशा वेळीं वरील मंत्राचा जप साधल्यास केलेल्या मदतीतला आपला भाग वेगळ्याच दृष्टीने उमगतो. अहंकाराची जागा सेवावृत्ती घेते. ही वृत्ती बळावणें ही एक योगमार्गावरची पहिली पायरी.

**- कौस्तुभ लेले**

****************************************

संता बंता जंगलात गेले होते.समोरून अचानक वाघ आला. संतानं प्रसंगावधानाने वाघाच्या डोळ्यात माती फेकली व तो बंताला म्हणाला,'पळ,पळ बंता!'

बंता हसत म्हणाला, 'मी का पळू? माती तू फेकलीस त्याच्या डोळ्यांत!!!

**************************************

# B D S

Financial Service Corporation

*Registered Investment Advisor*

Are your investments focused on your future … or just on today's headlines?

We can help you to

Prepare a roadmap for your future & to stay the course!

**Our services include:**

Retirement Planning Investment Planning Savings for College Tax Planning

Visit our website www.bdsfsc.com to learn more about us.

To get a second opinion,

call us at 440-248-5625 Or e-mail to BDS@BDSFSC.com

***Ashok Shendure, MS, MBA, CFP®, CEBS Rajanee Shendure, MBA, CFP®***

PLANNING

**If undelievered please return to**

**Anjali Joshi**
**963, Professor Road,**
**Lyndhurst,OH 44124**